# पोलिसांचेही फोटो पाठवा

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**



पोलिस आयुक्तांचे नागरिकांना आवाहन

शहरात पूर्वी हेल्मेटचा वापर खूपच कमी केला जात होता. पण, जनजागृती केल्यानंतर हे प्रमाण वीस टक्क्यांपर्यंत वाढले आहे. शंभर टक्के पोलिसांनी हेल्मेटचा वापर करायला हवा. जे पोलिस हेल्मेट घालणार नाहीत, त्यांचे फोटो काढून नागरिकांनी पाठवावेत. त्या पोलिसांना दंड करून त्यांचे नाव जाहीर केले जाईल, अशी माहिती पोलिस आयुक्त रश्मी शुक्ला यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

पुणे पोलिसांच्या वतीने 'राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान २०१७' राबविण्यात येत आहे. या वर्षी हेल्मेट घालण्याविषयी जनजागृती केली जात आहे. त्याची माहिती पोलिस आयुक्त रश्मी शुक्ला व सहआयुक्त सुनील रामानंद यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या वेळी फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या संचालिका रितू छाब्रिया, वाहतूक शाखेच्या उपायुक्त कल्पना बारवकर, गुन्हे शाखेचे उपायुक्त पी. आर. पाटील उपस्थित होते.

शुक्ला म्हणाल्या की, रस्ता सुरक्षा अभियानात हेल्मेट जनजागृतीसाठी १५ जानेवारी रोजी मोटारसायकल रॅली काढण्यात येणार आहे. यावेळी फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड व गोल्फ कंपनीच्या वतीने देण्यात आलेली १६०० हेल्मेट पोलिसांना वाटप करण्यात येणार आहेत. शिवाजीनगर पोलिस मुख्यालय येथून रविवारी सकाळी सात वाजता मोटारसायकल रॅलीला सुरुवात होणार आहे. शहरात हेल्मेट न घातल्यामुळे डोक्याला दुखापत होऊन मरणाऱ्यांची संख्या मोठी आहे. घरी कोणीतरी वाट पहात आहे. हे लक्षात घेऊन त्यांच्यासाठी तरी हेल्मेटचा वापर करा. जनजागृतीमुळे हेल्मेट वापरणाऱ्यांची संख्या वाढली आहे. शंभर टक्के पोलिसांनी हेल्मेटचा वापर करावा. जे पोलिस हेल्मेटचा वापर करणार नाहीत. त्यांचे फोटो काढून नागरिकांनी मला पाठवावेत. त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करत पोलिस नोटीसमध्ये नाव जाहीर केले जाईल, असे शुक्ला यांनी स्पष्ट केले.